## विशेष गरजा असलेल्या मुलांना शिकविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षकाची आवश्यकता असते -

१. शारीरिक अपंगत्व व सर्वसामान्य बुध्यंकापेक्षा कमी बुध्यंक असणाऱ्या मुलांना शिकविण्यासाठी “स्पेशल एज्युकेटर” ची गरज असते.
२. सर्वसामान्य बुध्यंक व त्यापेक्षा जास्त बुध्यंक असणाऱ्या परंतु अभ्यासात समस्या येणाऱ्या मुलांसाठी “रेमेडीअल टीचर” ची गरज असते.
३. दोन्ही प्रकारात कारक कौशल्ये (Motor Skills), नेत्र-हस्त समन्वय कौशल्य (Eye- Hand Co-ordination), अतीचंचलता (Hyperactivity) अशा समस्या असू शकतात.

## Dhruv Educational and Research Foundation remedial Teachers course चा अभ्यासक्रम –

सर्वसमावेशक शिक्षण या विषयी शासनाचा आग्रह व धोरणे अनुसरून या संदर्भात अधिक प्रशिक्षित शिक्षक व इतर घटक तयार व्हावेत हे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून Dhruv Educational and Research Foundation ने प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार केला आहे. यात खालील बाबींचा अंतर्भाव होतो -

- विशेष गरजांबाबतचे सिद्धांत (Theories regarding Disabilities).
- बहुआयामी बुद्धिमत्ता (Multiple Intelligence).
- विशेष गरजा असलेल्या मुलांची निवडप्रक्रिया.
- विद्यार्थ्यांच्या पालकाशी संवाद साधण्याचे कौशल्य.
- कमी कालावधी व जास्त कालावधीची उद्दिष्टे ठरवणे.
- विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे "वैयक्तिक नियोजन" (IEP) बनवण्याची पद्धती.
- वैयक्तिक नियोजन तक्त्यानुसार तासिकांची अंमलबजावणी करण्याचे तंत्र.
- मुल्यांकन व मूल्यमापन करण्याच्या पद्धती (Assessment & Evaluation).
- व्यक्तिगत अथवा संस्था स्तरावर या संबंधी चालणाऱ्या कामाची थोडक्यात माहिती.


**DHRUV**
EDUCATIONAL AND RESEARCH
FOUNDATION
CIN: U74120PN2016NPL158782

• Career Guidance • Child Remediation Center • Special Therapy Center
• Behavioral Counselling • Educational & Academic Development • Skill Development Programmes

2015, N.K.Image, 2nd Floor, Flat No 205, Near Grahak Peth, Tilak Road, Pune 30.

Cell : Madhavi Patwardhan - 9403764162, Dilip Bapat - 8149904238
Sharvari Apte - 9890792823, Swati Bapat - 7588571036

Email: edu.dhruv@gmail.com



**DHRUV**
EDUCATIONAL AND RESEARCH
FOUNDATION
CIN: U74120PN2016NPL158782


## Dhruv Educational and Research Foundation

Child Remediation Center
Career Guidance
Special Therapy Center
Behavioral Counselling
Educational & Academic Development
Skill Development Programmes



## समावेशित शिक्षण का व कोणासाठी ?

- जगात प्रत्येक जीव हा जसा वेगळेपणा घेऊन जन्माला येतो, आपलं विशेषत्व दाखवतो तसेच प्रत्येक मुल देखील विशेष आहे.
- प्राचीन भारतात गुरुकुल पद्धत अस्तित्वात होती, ज्यात श्रीकृष्ण, सुदामा, पेंद्या अशी विविध शारीरिक व बौद्धिक क्षमतांची मुले समान प्रकारचे अध्ययन एकत्रित करीत असत. परंतु सध्याच्या परिस्थितीत आपल्या शिक्षणपद्धतीतही मुलांच्या क्षमता व बुद्धिमत्ता याचं मुल्यांकन करण्यास अत्यल्प पर्याय उपलब्ध असल्याचे जाणवते.
- विद्यार्थी संख्येचा तुलनात्मक आलेख (Bell Curve) असे सांगतो की, ज्या मुलांना शिक्षणासाठी वेगळ्या व्यवस्थेची गरज आहे ही संख्या एकूण विद्यार्थी संख्येच्या ४.६% इतकी आहे. बाकी सर्व एकत्रित शिकू शकतात.
- एकत्रित शिकू शकणाऱ्या ९५.४% विद्यार्थ्यांमध्ये काही विद्यार्थी असे आहेत की ज्यांना थोड्या सहाय्याची गरज आहे. असे साधारण ५ ते ७ टक्के या गटात येतात.

## समावेशित शिक्षण आवश्यक असलेले विद्यार्थी कोणते?

- गतिमंद - Slow Learners
- अध्ययन अक्षम - Learning Difficulties/disabilities
- स्वमग्न - Autistic
- डाऊन्स सिंड्रोम - Down's syndrome
- अतिचंचलता - Hyperactivity
- अविकसित नेत्र-हस्त समन्वय - Undeveloped Eye-Hand Co-ordination Skills
- अविकसित स्थूल व सूक्ष्म कारक कौशल्ये - Undeveloped Gross & Fine Motor Skills

## समावेशित शिक्षणाचे होणारे फायदे

- मुले, पालक, शिक्षक यांचा सकारात्मक दृष्टीकोन तयार होतो.
- मुलांचा न्यूनगंड दूर होतो, संधी मिळते, "स्व"ची जाणीव होते.
- ही मुले देखील उत्पादक घटक होऊ शकतात याचा आत्मविश्वास सर्वांमध्ये निर्माण होतो.
- बरोबर शिकणाऱ्या मुलांमध्ये द्वेष न करता, सहानुभूती न देता, परस्पर पूरक राहण्याची भावना जागृत होते.
- विशेष गरजा असणारी मुले स्वतःच्या गतीने आत्मसन्मानाने यशाचा टप्पा गाठू शकतात.
- समाजाचा दर्जा वाढून एकात्म समाजाची निर्मिती होण्यास महत्वपूर्ण मदत होते.

## Dhruv Educational and Research Foundation - रेमेडीअल टिचिंग कार्यपद्धती

- अशा मुलांकरीता Dhruv Educational And Research Foundation रेमेडीअल सेंटर चालविते. विविध प्रकारची अध्यापन तंत्रे व खेळाच्या माध्यमातून मुलांचे संपूर्ण लक्ष शिक्षकावर केंद्रित होते आणि अर्थातच खेळीमेळीच्या वातावरणात एकमेकांसमोर बसून अध्ययन साध्य होते.

- Dhruv Educational and Research Foundation ची कार्यपद्धती -

**विद्यार्थ्यांचे मूल्यांकन → समस्येचा शोध → संबंधित व्यक्तींचे समुपदेशन → शिक्षणाचे व्यक्तिगत नियोजन → तासिकांचे नियोजन व अंमलबजावणी → अभिप्राय व पुनरावलोकन.**

- विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, समुपदेशक व समाजातील इतर घटक हे सर्व विद्यार्थ्यांच्या विकासातील महत्वाचे घटक आहेत. त्यामुळे या सर्व घटकांच्या सहभागातून विद्यार्थ्यांचा विकास साधणे आवश्यक असते.
  - ❋ पालकांचे समुपदेशन, विशेष मुलांच्या संगोपनासाठी प्रशिक्षण व गरजेनुसार त्यांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करून देणे.
  - ❋ विविध शाळांमध्ये संपर्क करून शिक्षकांचे प्रबोधन व प्रशिक्षण.
  - ❋ मुख्याध्यापक व गटशिक्षणाधिकारी यांचे रेमेडीअल शिक्षणा संबंधित प्रबोधन व प्रशिक्षण.
  - ❋ विविध सामाजिक कार्यक्रम, व्याख्याने, प्रदर्शने इ. माध्यमातून सर्वसमावेशित शिक्षणासंबधी जागृती.

